मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# 'हरित सेतू' प्रकल्पासाठी ब्रँड डिझाइन स्पर्धेचे आयोजन

## महापालिका आणि असोसिएशन ऑफ डिझायनर्स ऑफ इंडियाचा संयुक्त उपक्रम

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहराला भारतातील सर्वात उत्तम राहण्यास योग्य आणि नागरिक केंद्रित असणाऱ्या शहरांपैकी एक बनवण्याच्या दिशेने महापालिका अनेक नागरी विकास उपक्रम राबवत आहे. या उपक्रमांचा एक भाग 'हरित सेतू' प्रकल्प असून या अनुषंगाने विशेष ब्रँड डिझाइन स्पर्धा जाहीर करण्यात आली आहे. असोसिएशन ऑफ डिझायनर्स ऑफ इंडिया सहकार्याने आयोजित केलेल्या या स्पर्धेसाठी नोंदणी ९ जून २०२५ पासून सुरू होणार आहे.

या स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवणाऱ्या विजेत्यांना अनुक्रमे तीन लाख, दोन लाख व एक लाख रुपये रोख पारितोषिक देण्यात येणार आहे. तसेच विशेष ज्यूरी पारितोषिकही देण्यात येणार आहे.

'हरित सेतू' उपक्रमामार्फत महापालिका पादचारी केंद्रित रस्ते, सुसंगत पार्किंग व्यवस्था, मजबूत सार्वजनिक वाहतूक प्रणाली आणि सुरक्षित चौक यावर भर देत आहे. ही संकल्पना पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कार्यक्षम, समावेशक आणि शाश्वत वाहतूक प्रणालीच्या व्यापक दृष्टिकोनाचा भाग आहे.

याबाबत आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी सांगितले की, ' पिंपरी चिंचवड शहराने आता केवळ औद्योगिक शहर म्हणून ओळख मर्यादित न ठेवता एक प्रगत आणि नागरिकांच्या पसंतीचं शहर म्हणून ओळख निर्माण केली आहे. 'हरित सेतू'सारख्या उपक्रमांद्वारे वैज्ञानिक नियोजन आणि कलात्मक अभिव्यक्ती यांचा संगम घडवण्याचा आमचा प्रयत्न आहे.



पिंपरी चिंचवड महापालिका व असोसिएशन ऑफ डिझायनर्स ऑफ इंडिया यांच्यामध्ये हरित सेतू सह वेगवेगळ्या प्रकल्पाच्या अनुषंगाने महत्वपूर्ण करार आज झाला. यावेळी आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, उपायुक्त अण्णा बोदडे, कार्यकारी अभियंता सुनील पवार, असोसिएशन ऑफ डिझायनर्स ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळकृष्ण महाजन, पुणे विभाग अध्यक्ष योगेश दांडेकर, खजिनदार पुष्कर इंगळे, संघटनेच्या राष्ट्रीय कार्यकारिणीचे सदस्य ऋग्वेद देशपांडे, आदी उपस्थित होते.

### स्पर्धेचा कालावधी :

» नोंदणी सुरू : ९ जून २०२५
» सहभागींसाठी वेबिनार : १४ जून २०२५
अंतिम सादरीकरण दिनांक : २७ जून २०२५ (www.adiawards.org वरून सादर करावे)
» निकाल : १० जुलै २०२५

### देशभरातील सर्व डिझायनर्ससाठी स्पर्धा खुली

» ही स्पर्धा देशभरातील सर्व डिझायनर्ससाठी खुली आहे. सहभागी आणि पिंपरी चिंचवड महापालिका यांच्यात समन्वय साधण्याचे काम असोसिएशन ऑफ डिझायनर्स ऑफ इंडिया करणार आहे. स्पर्धेचे परीक्षण असोसिएशन ऑफ डिझायनर्स ऑफ इंडियाचे वरिष्ठ सदस्य व व्यावसायिक डिझायनर्सच्या परीक्षक मंडळाद्वारे केले जाईल. स्पर्धेदरम्यान सहभागासाठी असोसिएशन ऑफ डिझायनर्स ऑफ इंडियाद्वारे कार्यशाळा आणि चर्चासत्रांचे आयोजनही केले जाणार आहे.

# कामगार अन्यायावर विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांची ठाम भूमिका

## राज्यभरातील हजारो पीडित कामगारांसाठी पावले उचलली : यशवंत भोसले

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्यातील झपाट्याने होत असलेल्या औद्योगिकीकरणामध्ये अनेक वेळा श्रमिक वर्गाचा आणि पर्यावरणाचा विचार दुर्लक्षित केला जातो. अशाच अन्यायग्रस्त कामगारांच्या न्यायहक्कासाठी विधानसभेचे उपाध्यक्ष आण्णा बनसोडे यांनी पुढाकार घेतलेला आहे. त्यांच्या कार्यालयात झालेल्या विविध औद्योगिक कंपन्यांवरील बैठकींमध्ये अन्यायग्रस्त श्रमिकांना न्याय मिळवून देण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आल्याची माहिती पिंपरी येथे झालेल्या पत्रकार परिषदेत राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे अध्यक्ष यशवंत भोसले यांनी दिली.

यावेळी यशवंत भोसले म्हणाले की, राज्यभरातील अनेक कंपन्यांमध्ये पर्मनंट नोकऱ्या रद्द करून कंत्राटी, हंगामी स्वरूपात कामगारांना नियुक्त केले जात आहे. त्यामुळे सुशिक्षित तरुणांचे आयुष्य विस्कळीत होत असून, न्यायासाठी वर्षानुवर्षे न्यायालयाचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. या संदर्भात विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्याकडे निवेदन सादर करून ही माहिती दिली होती.

त्यानंतर त्यांनी तातडीने विविध औद्योगिक आस्थापनांसोबत समेटासाठी बैठका लावल्या. या बैठकीत कामगार आयुक्त, औद्योगिक आरोग्य सुरक्षा अधिकारी, पोलीस अधिकारी, संबंधित कंपन्यांचे प्रतिनिधी, तसेच संघटनेचे कार्यकर्ते सहभागी झाले होते. कोरोनाच्या काळात केंद्र सरकारने कोणत्याही कामगाराला



कामावरून काढू नये आणि वेतन द्यावे, असे आदेश दिले होते. मात्र, अनेक खाजगी व सरकारी संस्थांनी आदेश धुडकावून शेकडो कामगारांना कामावरून काढले. त्यामध्ये मे. पोलिबॉण्ड, राठी कंपनी, प्लास्टिक ओमनियम, लोकमान्य हॉस्पिटल, तुळजापूर देवस्थान इत्यादी आस्थापनांचा समावेश आहे.

मुंबई उच्च न्यायालय आणि कामगार आयुक्तांच्या आदेशानुसार कामगारांना पूर्ववत कामावर घेण्याचे आदेश देण्यात आले होते. तरीही गेल्या पाच वर्षांपासून कंपन्यांकडून आदेशांची अंमलबजावणी न करता वेळकाढूपणा सुरू आहे. टाटा मोटर्स फौंड्री, चिंचवड येथे फॅब्रिकेशन करत असताना पुष्पेंद्र कुमार (वय 26) या युवकाचा मोठ्या जॉबसखाली दबून मृत्यू झाला होता. याबाबत यशवंत भोसले व पत्रकार ब्रिजेश बडगुजर यांच्या माध्यमातून निवेदन देण्यात आले. उपाध्यक्ष बनसोडे यांनी गंभीर दखल घेतली असून, कंपनीकडून फक्त सहा लाख रुपये दिल्याचा दावा फेटाळत, कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी पुढील आर्थिक व शैक्षणिक मदतीबाबतचा अहवाल सादर करण्याचे आदेश दिले असल्याची माहिती भोसले यांनी दिली.

तुळजापूर देवस्थानच्या व्यवस्थापक व प्रांत अधिकाऱ्यांना कामावरून काढलेल्या कामगारांना आठ दिवसांत पुन्हा कामावर घेण्याचे आणि वेतन अदा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. कामगारांवर अन्याय करणाऱ्या कंपन्यांविरुद्ध ही लढाई आहे. उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या सक्रिय सहभागामुळे कामगारांना न्याय मिळण्याची आशा निर्माण झाली आहे. लोकन्याय हॉस्पिटलच्या कामगारांना कामावर घेण्यासाठी लवकरच आदेश काढणार असल्याचे बनसोडे यांनी सांगितले आहे. शासनस्तरावर पुढील बैठकीसाठी संबंधित कंपन्यांचे निर्णयक्षम अधिकारी व पोलीस, कामगार विभागाच्या प्रमुख अधिकाऱ्यांना हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. निर्णय न झाल्यास शासनाकडून थेट आदेश दिले जातील, असे सूतोवाच उपाध्यक्षांनी केले. सरकारने उचललेले पाऊल हे आशावादी असल्याचे मत यशव भोसले यांनी व्यक्त केले.

# पुणे बनणार जागतिक पर्यटन केंद्र!

## पुण्यात पुढील वर्षी जानेवारी महिन्यात पुणे ग्रँड सायकल चॅलेंज स्पर्धा होईल; जिल्हाधिकारी

**पुणे | प्रतिनिधी**

‘भविष्यात पुण्याची ओळख जागतिक पर्यटन केंद्र म्हणून व्हावी, यासाठी एकात्मिक पर्यटन आराखडा तयार करण्यात आला आहे. या माध्यमातून पुण्यात पुढील वर्षी जानेवारीमध्ये महिनाभर विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येईल. या स्पर्धांच्या निमित्ताने जगभरातील पर्यटक पुण्यात येतील,’ अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी शुक्रवारी दिली.



क्रेडाई – पुणे मेट्रोच्या वतीने आयोजित कार्यक्रमात डूडी बोलत होते. ते म्हणाले, ‘जिल्ह्याचा इतिहास, वारसा, भौगोलिक स्थळे, गड-किल्ले यांच्या पर्यटन क्षमता मोठ्या असून, एकात्मिक पर्यटन आराखडा तयार करण्यात आला आहे. पुण्याला जागतिक पातळीवरील पर्यटन केंद्र बनविण्याचे नियोजन आहे. यासाठी सरकारी खर्च न करता खासगी क्षेत्राचा जास्तीत जास्त सहभाग घेतला जात आहे.’

‘पुण्यात पुढील वर्षी जानेवारी महिन्यात पुणे ग्रँड सायकल चॅलेंज ही स्पर्धा होईल. फ्रान्समधील टूर डी फ्रान्सच्या धर्तीवर ही स्पर्धा असेल. या स्पर्धेत जगभरातील स्पर्धक सहभागी होतील. या निमित्ताने स्पर्धेच्या मार्गावरील जिल्ह्यातील रस्ते खड्डेमुक्त आणि चकाचक होतील. पुण्यात पॅराग्लायडिंग वर्ल्ड चॅम्पियनशिप, हॉट एअर बलून फेस्टिव्हल पुढील वर्षी जानेवारीत होतील,’ असे त्यांनी सांगितले.

‘जानेवारीमध्ये महिनाभर विविध स्पर्धा आणि महोत्सव सुरू राहणार आहेत. त्यामुळे या निमित्ताने पुण्यात महिनाभर जागतिक पर्यटक येतील आणि पर्यटनाला चालना मिळेल. जगातून पर्यटक आल्यामुळे विविध क्षेत्रांतील अर्थव्यवस्थेला चालना मिळणार आहे. या माध्यमातून पुण्याची ओळख जागतिक पातळीवर पर्यटन केंद्र म्हणून होईल,’ असेही जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

### ‘दिल्लीसारखी स्थिती होऊ नये!’

» वायू प्रदूषणाच्या गंभीर समस्येकडे पिंपरी-चिंचवडचे महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी लक्ष वेधले. ते म्हणाले, ‘पुणे, पिंपरी-चिंचवड या शहरांची वाढ वेगाने होत आहे. याच वेळी वायू आणि जल प्रदूषणात वाढ होत आहे. शहरातील ४० टक्के वायू प्रदूषण बांधकामांमुळे होते. त्यामुळे बांधकाम क्षेत्राने हे प्रदूषण कमी करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. वायू प्रदूषण रोखण्यासाठी वेळीच पावले न उचलल्यास दिल्लीसारखी स्थिती होऊ शकते. शहराची वाढ होताना पाण्याची टंचाईसुद्धा जाणवत आहे. त्यामुळे जलस्रोतांचे जतन करण्याची आवश्यकता आहे.’

# महापालिका प्रशासनाकडून निवडणुकीची तयारी सुरू

## महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी याबाबत आढावा बैठक घेतली

**पुणे | प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रखडलेल्या निवडणुका चार महिन्यांमध्ये घेण्याच्या सूचना सर्वोच्च न्यायालयाने दिल्याने महापालिका प्रशासनाने निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. राज्य निवडणूक आयोगाकडून अद्याप याबाबत सूचना आलेल्या नसल्या, तरीही महापालिकेकडून पूर्वतयारीला सुरुवात करण्यात आली आहे.

महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी याबाबत आढावा बैठक घेतली. त्यामध्ये मतदार केंद्र, निवडणूक अधिकारी कार्यालयांसाठी जागा शोधणे, निवडणुकीसाठी लागणारे अतिरिक्त मनुष्यबळासाठी राज्य सरकारच्या विविध विभागांशी संपर्क साधणे, याबाबत सूचना दिल्या.

सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश दिले आहेत. राज्य निवडणूक आयोग किंवा राज्य सरकारने अद्याप याबाबत सूचना दिलेल्या नाहीत. त्यापूर्वीच पूर्वतयारी सुरू करण्यात आली असल्याचे अतिरिक्त आयुक्त दिवटे आणि महापालिकेचे निवडणूक विभागाचे प्रमुख प्रसाद काटकर यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

दिवटे म्हणाले, ‘आगामी निवडणूक ही चार सदस्यीय प्रभाग पद्धतीने होण्याची शक्यता आहे. त्यामुळे चार जागांसाठी उमेदवारांची संख्या अधिक असणार आहे. मतदान प्रक्रियेला लागणारा वेळ गृहीत धरून एका केंद्रावर आठशे मतदारांच्या मतदानाची सुविधा असते. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीपेक्षा महापालिकेच्या निवडणुकीत अधिक मतदान केंद्र




असणार आहेत. तसेच निवडणूक अधिकाऱ्यांसाठी कार्यालयांची आवश्यकता भासणार आहे. महापालिकेत नव्याने २३ गावांचा समावेश करण्यात आल्याने तेथे नव्याने मतदान केंद्र उभारावी लागणार आहेत.

### मतदार यादीतील प्रसिद्ध व्यक्तींची नावे तपासा

» मतदार याद्यांमधून वर्षानुवर्षे असलेली ‘सेलिब्रेटीं’ची नावे वगळण्याच्या घटना अनेकदा घडतात. त्यामुळे आपल्या भागात राहत असलेल्या प्रसिद्ध व्यक्तींच्या नावांची तपासणीदेखील करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच निवडणुकीच्या कामासाठी अधिकचे मनुष्यबळ लागणार असल्याने राज्य सरकारच्या कार्यालयांना पत्र पाठवून त्यांच्याकडील मनुष्यबळाची माहिती संकलित करण्याच्या सूचना या बैठकीत देण्यात आल्या.

# चव बदललेली असली तरी पाणी पिण्यायोग्यच

## प्रक्रिया करूनच नागरिकांना पाण्याचे वितरण; महापालिका पाणी पुरवठा विभागाची माहिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

पावसाळ्याच्या सुरुवातीला नदीच्या पाण्यात गाळ, झाडपाला, सांडपाण्यासह इतर कचरा वाहून येतो. त्यामुळे हे पाणी काही प्रमाणात गढूळ असते. मात्र महापालिकेच्या वतीने जलशुद्धीकरण केंद्रांमध्ये जागतिक आरोग्य संघटना व केंद्रीय सार्वजनिक आरोग्य आणि पर्यावरण अभियांत्रिकी संघटनेच्या नियमांप्रमाणे शुद्धीकरणाची प्रक्रिया करण्यात येते. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच पाणी नागरिकांना वितरित केले जाते.

पाण्याची चव व वास बदललेला जाणवत असला तरी ते पाणी पूर्णतः पिण्यायोग्य आहे, अशी माहिती महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने दिली आहे. तसेच पावसाळ्यात पाणी उकळून प्यावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

पिंपरी-चिंचवड शहराला मावळमधील पवना व आंद्रा धरणातून पाणी पुरवठा केला जातो. मात्र पावसाळ्यातील चार महिने धरणातील साठा न वापरता नदीतील पाण्याचा वापर होतो. या कालावधीत नदीच्या पाण्यात गाळ, झाडपाला, व सांडपाण्यासारखा कचरा वाहून येतो. यामुळे पाणी गढूळ होते व टीडीएस म्हणजे एकूण विरघळलेल्या घन पदार्थांचे प्रमाण वाढते. याचा परिणाम पाण्याच्या चव व वासावर किंचित प्रमाणात होतो.

महापालिका रावेत बंधाऱ्यावरून अशुद्ध पाणी उचलते, जे प्राधिकरण व निगडी येथील जलशुद्धीकरण केंद्रात पाठवले जाते. तसेच आंद्रा धरणातील पाणी इंद्रायणी नदीवरील निघोजे बंधाऱ्यावरून उचलून चिखली येथील जलशुद्धीकरण केंद्रात आणले जाते. येथे आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे सर्व आवश्यक प्रक्रिया पार पाडली जाते. नंतर हे पाणी विविध टाक्यांमध्ये साठवले जाते आणि त्यामधून नागरिकांना वितरण केले जाते. महापालिकेच्या वतीने जलशुद्धीकरण केंद्रांमध्ये जागतिक आरोग्य संघटना व केंद्रीय सार्वजनिक आरोग्य आणि पर्यावरण अभियांत्रिकी संघटनेच्या नियमांप्रमाणे शुद्धीकरणाची प्रक्रिया करण्यात येते. पाण्याची चव व वास बदललेला जाणवत असला तरी ते पाणी पूर्णतः पिण्यायोग्य आहे, अशी माहिती महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने दिली




### पाणी पुरवठा विभागाचे उपाय

- महापालिकेच्या वतीने नागरिकांना योग्य प्रक्रिया केलेले व स्वच्छ पाणी देण्यात येते.
- जलशुद्धीकरण केंद्रात जागतिक आरोग्य संघटना व केंद्रीय सार्वजनिक आरोग्य आणि पर्यावरण अभियांत्रिकी संघटनेच्या मानकानुसार प्रक्रिया
- पाईपलाइन व टाक्यांचे नियमित स्वच्छीकरण
- गढूळ पाण्याच्या तक्रारींची तत्काळ दखल व उपाय
- दररोज पाण्याच्या गुणवत्तेची तपासणी
- किंचित चव बदलली असली तरी पाणी पिण्यायोग्यच

> “ नागरिकांनी घाबरून जाऊ नये. पावसाळ्याच्या सुरुवातीला पाणी थोडं गढूळ होणे हे सर्वत्र स्वाभाविक आहे. यासाठी उपाय म्हणून नागरिकांनी पाणी उकळून वापरावे. गढूळ पाण्याच्या तक्रारी असलेल्या भागात महापालिकेचे विशेष लक्ष आहे.
>
> - प्रमोद ओंभासे, मुख्य अभियंता , पाणीपुरवठा विभाग

> “ शहरवासीयांना स्वच्छ आणि शुद्ध पाणी मिळावे, यासाठी महापालिकेचा पाणी पुरवठा विभाग कटिबद्ध आहे. पाण्यावर शुद्धीकरणाची प्रक्रिया जागतिक आरोग्य संघटना व केंद्रीय सार्वजनिक आरोग्य आणि पर्यावरण अभियांत्रिकी संघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार केली जात आहे. ज्या भागात गढूळ पाणी येत आहे, तेथील नागरिकांनी स्थानिक पाणीपुरवठा कार्यालय किंवा नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा, तक्रारींवर तत्काळ कार्यवाही केली जाईल.
>
> - प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त (१),

# मारूंजीतील अनधिकृत बांधकामावर हातोडा, पीएमआरडीएकडून ६ मजली इमारत जमीनदोस्त

## अनधिकृत होर्डिंग आणि बांधकामांवर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून धडक कारवाई करण्यात येत आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून अनधिकृत होर्डिंग आणि बांधकामांवर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून धडक कारवाई करण्यात येत आहे. गुरुवारी (दि.५) मारुंजी भागातील सर्वे नंबर ४५/१/२ मधील मोठ्या अनाधिकृतरित्या उभारण्यात आलेल्या इमारतीवर कारवाई करून ती जमीनदोस्त करण्यात आली.

पीएमआयडीएने केलेला सर्वेक्षणात ९६७ अनाधिकृत होर्डिंग आढळून आल्या आहेत. गत काही दिवसात १२२ होर्डिंग अनाधिकृत बांधकाम व निर्मूलन विभागाच्या पथकामार्फत काढण्यात आल्या आहे. रहदारीस अडथळ तसेच लोकांच्या जीविताला धोका निर्माण होईल अशा अनाधिकृत होर्डिंगवर धडक कारवाई करण्यात येत आहे.

पीएमआरडीए हद्दीत अनधिकृत बांधकाम सुरू असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. याची दखल घेत अशा बांधकामावर थेट कारवाई सुरू आहे. त्यानुसार गुरुवारी मारुंजी परिसरातील अनधिकृत असलेल्या सर्वे नंबर ४५/१/२ या भागातील ६ मजली इमारतीवर कारवाई करून ती जमीनदोस्त करण्यात आली.



### अनाधिकृत होर्डिंगवर धडक कारवाई

- पीएमआयडीएने केलेला सर्वेक्षणात ९६७ अनाधिकृत होर्डिंग आढळून आल्या आहेत. गत काही दिवसात १२२ होर्डिंग अनाधिकृत बांधकाम व निर्मूलन विभागाच्या पथकामार्फत काढण्यात आल्या आहे. रहदारीस अडथळ तसेच लोकांच्या जीविताला धोका निर्माण होईल अशा हवेली, भोर, मुळशी, पुरंदर, दौंड आदी भागातील अनाधिकृत होर्डिंगवर धडक कारवाई करण्यात येत आहे.

महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी दिलेल्या निर्देशानुसार संबंधित कारवाई करण्यात येत आहे. सदर कारवाई प्रभारी महानगर आयुक्त दिपक सिंगला, पोलिस अधिक्षक तथा दक्षता अधिकारी अमोल तांबे, उपजिल्हाधिकारी डॉ. दिप्ती सुर्यवंशी-पाटील, प्रमोद कुदळे यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करण्यात आली. कारवाईवेळी प्राधिकरणाचे तहसीलदार रविंद्र रांजणे, सचिन म्हस्के, पोलीस निरिक्षक महेशकुमार सरतापे यांच्यासह स्थानिक बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

# प्रभागरचनेविरोधात बारामतीत सर्वपक्षीय बैठक

**सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश दिल्यानंतर राज्यात आता निवडणूक प्रक्रिया सुरू करण्यात येत आहे.**

**पुणे | प्रतिनिधी**

सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश दिल्यानंतर राज्यात आता निवडणूक प्रक्रिया सुरू करण्यात येत आहे. यामध्ये प्रभाग रचना करत असताना प्रस्थापित राजकारण्यांच्या दबावाखाली नियमबाह्य पद्धतीने स्वतःच्या पक्षाला सोयीचे प्रभाग बनवले जातात.

त्यामुळे बारामतीत प्रभाग रचनेविरोधात सर्वपक्षीय बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत सत्ताधाऱ्यांकडून अशा पद्धतीचा प्रयत्न झाल्यास जनआंदोलन उभे करण्याचा निर्णय घेण्यात आला. राष्ट्रवादी (अजित पवार) काँग्रेस वगळता अन्य सर्व पक्षांचे प्रतिनिधी या बैठकीला उपस्थित होते.

या बैठकीला मनसेचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड. सुधीर पाटसकर, पालिकेचे माजी विरोधी पक्षनेते सुनील सस्ते, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष ॲड. एस. एन. जगताप, शहराध्यक्ष ॲड. संदीप गुजर, युवकाध्यक्ष सत्यव्रत काळे, मनसेचे ॲड. पोपटराव सूर्यवंशी, ॲड. नीलेश वाबळे, बसपाचे प्रदेश सरचिटणीस काळूराम चौधरी, वंचित युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष मंगलदास निकाळजे, शिवसेना (उबाठा)चे ॲड. राहुल शिंदे, रिपाइंचे राजेंद्र सोनवणे, एमआयएमचे फैय्याज शेख, भाजपचे ॲड. नितीन भामे, यशपाल भोसले, काँग्रेसचे वीरधवल गाडे, रासपचे ॲड. अमोल सातकर, शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख सुरेंद्र जेवरे आदी उपस्थित होते.

प्रभाग रचना करताना ती स्वतःला अनुकूल करण्याचा प्रयत्न केला जातो. राजकारण्यांच्या दबावाखाली अधिकारी हे काम करतात. त्यातून विरोधक निवडून येऊ नयेत याची दक्षता घेतली जाते. प्रभाग रचना करताना नैसर्गिक सीमांचे पालन केले जात नाही. प्रभाग सोयीने फोडले जातात. ज्या समुदायाचे प्रभागात प्राबल्य आहे ते राहू नये, यासाठी त्यातील काही भाग दुसऱ्या प्रभागात जोडला जातो.



## जनआंदोलन छेडण्याचाही निर्धार

» नागरिकांमध्ये जनजागृती करणे, विविध प्रभागांमध्ये बैठका व सभा घेणे, पत्रकार परिषदा घेत त्या माध्यमांतून भूमिका मांडणे, निवेदनाद्वारे प्रशासकीय पातळीवर हरकत नोंदवणे, आवश्यकतेनुसार न्यायालयात याचिका दाखल करणे अशा सर्व टप्प्यांवर एकसंघपणे लढा देण्याचा निर्णय घेण्यात आला. निवडणुकीसंबंधी एकतर्फी होत असलेली कार्यवाही थांबविण्यासाठी जनआंदोलन छेडण्याचाही निर्धार या बैठकीत करण्यात आला.

## प्रभागरचना असावी जनतेच्या हितासाठी

» बैठकीत प्रभाग रचना ही लोकप्रतिनिधींच्या सोयीसाठी नव्हे, तर जनतेच्या हितासाठी असावी, असे स्पष्ट करत सद्यःस्थितीत करण्यात आलेले प्रभाग हे अन्यायकारक व पक्षपाती असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. त्यामुळे जुनी रचना तत्काळ रद्द करून नव्याने न्याय्य पद्धतीने प्रभाग रचना करावी, अशी मागणी करण्यात आली

## चुकीच्या प्रभाग रचनेला तीव्र विरोध

» प्रभागांमध्ये मतदारांची एकसारखी संख्या ठेवली जात नाही. नदी, रस्ते, रेल्वे लाईन, ओढे, नाले या नैसर्गिक सीमा लक्षात न घेता त्या पलीकडील भाग एकत्र करून प्रभाग बनवले जातात. त्यामुळे बारामती शहर व तालुक्यात नव्याने करण्यात येणाऱ्या प्रभाग रचनेमध्ये कायदेशीरपणे व नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वाच्या आधारे प्रभाग रचना करण्यासाठी व बेकायदेशीर प्रभाग रचनेच्या विरोधात आवाज उठवण्यासाठी ही बैठक घेतली गेली. या वेळी उपस्थित सर्व पक्षांच्या प्रतिनिधींनी एकमुखाने या चुकीच्या प्रभाग रचनेला तीव्र विरोध करत तक्रारी, हरकती दाखल करण्याचा निर्णय घेतला.

# कऱ्हा नदीच्या पात्रात जलआंदोलन, विमानतळ प्रकल्पाला दर्शविला विरोध

**प्रकल्प बाधित गावातील शेतकऱ्यांनी शासनाच्या विरोधात तब्बल आठ वर्षांपासून लढा पुकारला असून तो लढा अद्याप सुरूच आहे.**

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर तालुक्यातील प्रस्तावित विमानतळ प्रकल्प कोणत्याही परिस्थितीत होऊ देणार नाही यासाठी प्रकल्प बाधित गावातील शेतकऱ्यांनी शासनाच्या विरोधात तब्बल आठ वर्षांपासून लढा पुकारला असून तो लढा अद्याप सुरूच आहे. दरम्यान, प्रकल्पाला विरोध करण्यासाठी शेतकऱ्यांनी जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने गुरुवारी (दि. 5) दुपारी कऱ्हा नदीच्या पात्रात जलआंदोलन करून शासनाचा पुन्हा एकदा जोरदार निषेध केला आहे.

पुरंदर तालुक्यातील वनपुरी, उदाचीवाडी, कुंभारवळण, एखतपूर, मुंजवडी, खानवडी, पारगाव अशा सात गावात शासनाकडून आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प प्रस्तावित असून सध्या या गावातील भूसंपादनची प्रक्रिया सुरु आहे. शासनाने प्रकल्प बाधित गावातील जमिनीच्या सातबारा उतारा वर 32/2 चे शेरे मारल्यानंतर सातही गावातील शेतकऱ्यांकडून हरकती मागून घेतल्या आहेत. यामध्ये दोन हजार पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी हरकत घेतली असून या शेतकऱ्यांना येत्या आठवडाभरात पुन्हा नोटीस पाठवून त्यावर सुनावणी घेण्याची प्रक्रिया जिल्हाधिकारी कार्यालयाकडून राबविण्यात येणार आहे.

दरम्यान, विमानतळ प्रकल्पाला संबंधित गावातील शेतकऱ्यांचा विरोध आजही सुरूच असून जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने शेतकऱ्यांनी वृक्ष लागवड करून कऱ्हा नदी बचाव तसेच कऱ्हा नदीच्या पात्रात बसून जल आंदोलन केले. यावेळी शासनाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

सकाळी 11.30 वा. कुंभारवळण येथील कऱ्हा नदीच्या पात्रात जल पूजन करण्यात आले. त्यानंतर सुमारे दोन तास पाण्यात बसून आंदोलन केले. यावेळी शासनाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. त्यानंतर एखतपूर मुंजवडी येथील शासकीय गायरानमध्ये जागतिक पर्यावरण दिनानिमित्त कऱ्हा नदी बचाव आणि वृक्षारोपण करून पर्यावरण दीन साजरा करण्यात आला. यावेळी जितेंद्र मेमाणे, संभाजी ब्रिगेडचे पुणे जिल्हाध्यक्ष संतोष हगवणे, युवराज मेमाणे, तुषार झुरंगे, काळूराम कुंभारकर, वैशाली कुंभारकर, आशा हगवणे, विठ्ठल हगवणे, सिंधुताई हगवणे यांच्यासह प्रकल्प बाधित गावातील शेतकरी उपस्थित होते.



## आमच्या मातीत जगू द्या

» आम्हाला कोणत्याही परिस्थितीत विमानतळ प्रकल्प नको आहे. यासाठी आम्ही शासनाच्या विरोधात गेली आठ वर्षांपासून लढा देत आहोत. मात्र शासन आमचे म्हणणे ऐकून न घेता मनमानी पद्धतीने आमच्या जमिनीचे जबरदस्तीने संपादन प्रक्रिया राबवित आहे. आम्ही आता देशाच्या राष्ट्रपतींना सुद्धा पत्राद्वारे विमानतळ प्रकल्प हद्दपार करण्याची मागणी केली आहे. आम्हाला आमच्या मातीत जगू द्या ही शासनाला कळकळीची विनंती आहे, अशी मागणी पारगाव येथील जितेंद्र मेमाणे आणि उदाचीवाडी येथील संतोष हगवणे यांनी केली आहे.